एसईपीसीकडून यूएईतील आवनीरमध्ये ९० टक्क्यांपर्यंत हिस्सेदारी अधिग्रहित करण्याची घोषणा

चेन्नई, दि. ०८ (वृत्तसंस्था) : औद्योगिक पायाभूत सुविधा, प्रक्रिया प्रकल्प तसेच पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन क्षेत्रातील ईपीसी कंपनी एसईपीसी लिमिटेडने संयुक्त अरब अमिरातीतील (यूएई) अबूधाबीस्थित आवनीर इंटरनॅशनल इंजिनिअर्स अँड कन्सल्टंट्स लिमिटेड लायबिलिटी कंपनीमध्ये ९० टक्क्यांपर्यंतची इक्विटी हिस्सेदारी अधिग्रहित करण्याची घोषणा केली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने या व्यवहारासह अनेक धोरणात्मक प्रस्तावांना मंजुरी दिली असून, ते भागधारक आणि संबंधित नियामकांच्या मंजुरीच्या अधीन असतील.

या अधिग्रहणासाठी एसईपीसीकडून प्रति समभाग ₹१० या इश्यू किमतीने १५३ कोटी इक्विटी समभागांचे प्राधान्य वाटप (प्रेफरेंशियल अलॉटमेंट) आवनीरच्या भागधारकांना करण्यात येणार आहे. शेअर स्वॅप पद्धतीने होणाऱ्या या व्यवहाराचे एकूण मूल्य ₹१,५३० कोटी असून, यासाठी कोणताही रोख खर्च करण्यात येणार नाही.

कंपनीच्या माहितीनुसार, हा व्यवहार डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. अधिग्रहण पूर्ण झाल्यानंतर एसईपीसीची मध्य पूर्वेतील अभियांत्रिकी आणि सल्लागार सेवा क्षेत्रातील उपस्थिती अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. एसईपीसीच्या संचालक मंडळाने मंजूर केलेले हे प्रस्ताव कंपनीचा भांडवली पाया मजबूत करणे, आर्थिक लवचिकता वाढवणे आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील विस्ताराला चालना देणे या उद्देशाने तयार करण्यात आले आहेत. जागतिक स्तरावर पायाभूत सुविधा आणि अभियांत्रिकी प्रकल्पांमधील संधींचा लाभ घेण्यासाठी या व्यवहाराला महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

आवनीर इंटरनॅशनल इंजिनिअर्स अँड कन्सल्टंट्स ही अबूधाबीस्थित अभियांत्रिकी आणि सल्लागार सेवा देणारी कंपनी असून, या अधिग्रहणामुळे एसईपीसीला जागतिक प्रकल्पांमध्ये सहभाग वाढवण्यास आणि आंतरराष्ट्रीय व्यवसाय विस्तारास मदत होईल, असा कंपनीचा विश्वास आहे. व्यवहार पूर्ण होण्यासाठी आवश्यक भागधारक आणि नियामक मंजुरीनंतर पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

जूनमध्ये किरकोळ महागाई ४ टक्क्यांवर जाण्याचा अंदाज; १६ महिन्यांतील उच्चांकाची शक्यता

नवी दिल्ली, दि. ०९ (वृत्तसंस्था) : देशातील किरकोळ महागाई पुन्हा वाढीच्या दिशेने वाटचाल करत असून, जून महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकावर (सीपीआय) आधारित महागाईचा दर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्के लक्ष्यापेक्षा वर जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अर्थतज्ज्ञांच्या ताज्या सर्वेक्षणानुसार, गेल्या १६ महिन्यांनंतर प्रथमच किरकोळ महागाई ४ टक्क्यांच्या पुढे जाऊ शकते. केंद्र सरकारकडून जून महिन्याची अधिकृत महागाईची आकडेवारी १३ जुलै रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

रॉयटर्सने ३ ते ९ जुलैदरम्यान ३७ अर्थतज्ज्ञांमध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार, मे महिन्यात ३.९३ टक्के असलेला किरकोळ महागाईचा दर जूनमध्ये ४.३० टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. सर्वेक्षणातील विविध तज्ज्ञांनी ३.६५ ते ५.५० टक्क्यांदरम्यान महागाईचा अंदाज व्यक्त केला आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, वाढत्या इंधनाच्या किमती, जागतिक पातळीवरील भू-राजकीय तणाव आणि कमकुवत मान्सूनची शक्यता यामुळे महागाईवर दबाव वाढत आहे. विशेषतः अन्नधान्य, इंधन आणि सेवा क्षेत्रातील किमतींमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने ग्राहकांवरील महागाईचा भार वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. सोसिएते जेनेरालचे अर्थतज्ज्ञ कुणाल कुंडू यांनी अन्नपदार्थ, इंधन आणि निवडक सेवा क्षेत्रातील किमती वाढल्यामुळे महागाईवर दबाव कायम असल्याचे नमूद केले आहे.

एल निनोच्या प्रभावामुळे मान्सून कमकुवत राहिल्यास आणि खरीप हंगामातील पीक उत्पादनावर परिणाम झाल्यास अन्नधान्याच्या किमतींमध्ये आणखी वाढ होऊ शकते, असा इशाराही तज्ज्ञांनी दिला आहे.

WESTERN RAILWAY

CORRIGENDUM

1. Tender Notice No. & Date: BCT/26-27/84, 85 & 86, dtd.02.07.2026. Existing Tender closing date: 28.07.2026. **Now to be read as: 04.08.2026**. All other terms and conditions remain the same. 0347

Like us on: facebook.com/WesternRly

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, आमच्या अशीलांनी सदनिका क्र. ३०३, ३ रा मजला, ए विंग, गोराई जीवनधारा सीएचएसएल, भूखंड क्र. ९४, गोराई पार्ट-II, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ९२ (सदर मालमत्ता) खरेदी करण्याचा आणि पुढे इंडियन ओव्हरसीज बँक, दहिसर (पूर्व) शाखा यांच्या बाजूने गहाण ठेवण्याचा हेतू आहे.

असे प्रतिपादन केले गेले आहे की, सदर मालमत्तेच्या संदर्भात तनुजा शांताराम कानडे यांच्या बाजूने असलेले दिनांक २०.१०.२००१ रोजीचे वाटप पत्र अनोंदणीकृत आहे.

जर कोणाही व्यक्तीने सदर दस्तऐवज/मालमत्तेवर कोणत्याही हक्काचा दावा केल्यास त्यांनी या सूचनेच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत असताना अधोलिखित यांच्याकडे आपला दावा सादर करावा, तसे न केल्यास सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर असलेला असा कोणताही दावा अशा दाव्याचा कोणताही संदर्भ न घेता सोडून दिला असल्याचे मानले जाईल.

दिनांक १० जुलै २०२६

सही/-
शुक्ला अँड शुक्ला
अँडव्होकेट्स
श्री हनुमान बिल्डिंग, ३ रा मजला, चेंबर क्र. १२, २, आर. एस. सप्रे मार्ग, मुंबई ४०० ००२.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशिल **श्री. नरेंद्र लखाराम चौधरी** यांचे वडील **लखाराम पी. चौधरी** यांनी 'कीस्टोन रियल्टर्स प्रा. लि.' यांच्याकडून **'रुस्तमजी रिजेन्सी-३ सीएचएस लि.'**, रुस्तमजी इराणी मार्ग, जयवंत सावंत रोड, रुस्तमजी स्कूलजवळ, दहिसर (पश्चिम), मुंबई-४०००६८ येथील **'ए-विंग'**मधील पहिल्या मजल्यावरील **फ्लॅट क्र. ३ए-१२** ज्याचे **क्षेत्रफळ ५५.१६ चौरस मीटर / ५९३.७५ चौरस फूट कार्पेट हा दि. १२.०१.२००० रोजीच्या नोंदणीकृत करारनाम्याद्वारे (दस्तऐवज क्र. पीबीडीआर/२/७३१/२०००, दिनांक १०.०२.२०००) खरेदी केला होता.**

माझ्या अशिलांनी नमूद केले आहे की, **त्यांचे वडील लखाराम पी. चौधरी यांचे १९.०४.२०२० रोजी मुंबई,** महाराष्ट्र येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारस, म्हणजेच **(१) श्रीमती. हिरादेवी लखाराम चौधरी (पत्नी), (२) श्रीमती लीला कर्मिराम चौधरी (माहेरचे नाव: लीला लखाराम चौधरी) - विवाहित मुलगी, (३) सौ. संजू देवी काला राम (माहेरचे नाव: संजू देवी लखाराम चौधरी) - विवाहित मुलगी, (४) सौ. गीता देवी हिरेंद्र कुमार (माहेरचे नाव: गीता देवी लखाराम चौधरी) - विवाहित मुलगी आणि (५) सौ. सुखी देवी महेंद्र कुमार (माहेरचे नाव: सुखी देवी लखाराम चौधरी)** यांनी एकत्रितपणे **१६.०५.२०२४** रोजीचा नोंदणीकृत 'हक्क-सोड पत्र', नोंदणीकृत दस्तऐवज क्र. बीआरएल७-१०६३०-२०२४, दिनांक १६.०५.२०२४, पावती क्र. ११३१५ आहे.

माझ्या अशिलांचे असे म्हणणे आहे की, जर मृत लखाराम पी. चौधरी यांचे इतर कोणतेही कायदेशीर वारस, दावेदार किंवा प्रतिनिधी, अथवा कोणतीही बँक/वित्तीय संस्था किंवा अन्य कोणतीही त्रयस्थ व्यक्ती यांना सदर फ्लॅटमधील त्यांच्या अविभक्त वैयक्तिक हिश्श्याबाबत कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, गहाण, धारणाधिकार किंवा तारण इत्यादी बाबींवरून काहीही दावा करायचा असेल, तर त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५ दिवसांच्या आत** त्याबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह मला निम्नस्वाक्षरीकारास लेखी स्वरूपात कळवावी; अन्यथा, त्यांचे सर्व दावे त्यांनी सोडून दिले आहेत असे मानले जाईल आणि त्यानंतर त्यांवर कोणताही विचार केला जाणार नाही.

सही/-
शिवपूजन ए. यादव,
उच्च न्यायालयाचे वकील.
रूम क्र. १२, बाबू यादव चाळ, गांधीनगर, (खजुरवाडी), जोगेश्वरी (प), मुंबई-१०२.
ठिकाण: मुंबई दिनांक: १०/०७/२०२६

Mahindra FINANCE

महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबई - ४०० ००१.
कॉर्पोरेट कार्यालय: बी विंग, तिसरा मजला, अगस्त्य कॉर्पोरेट पार्क, पिरामल अमिटी बिल्डिंग, कमानी जंक्शन, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०.

ताबा सूचना
(जंगम मालमत्तेसाठी) सरफेसी कायदा आणि नियमांमधील नियम ४-(१)

'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफेसी कायदा) अन्वये महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, मी निम्नस्वाक्षरीकार **मेसर्स. लीलावती इंजिनिअरिंग (कर्जदार - मालक: अमरजीत लालबिहारी जयस्वाल), श्री. अमरजीत लालबिहारी जयस्वाल(सह-कर्जदार १) आणि सौ. लीलावती लालबिहारी जयस्वाल (सह-कर्जदार २)** यांना **दि. ५ फेब्रुवारी २०२६** रोजी मागणी नोटीस बजावली होती. या नोटीसद्वारे त्यांना **४ फेब्रुवारी २०२६ रोजी थकीत असलेली ३१,४८,६४५/- रुपये (अक्षरी रुपये एकतीस लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे पंचेचाळीस फक्त)** ही रक्कम, नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्यास सांगण्यात आले होते.

कर्जदाराने सदर रक्कम परत करण्यात कसूर केल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, मी (खाली सही करणारे) उक्त कायद्याच्या कलम १३(४) आणि उक्त नियमांच्या नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा आज **दिनांक ७ जुलै २०२६** रोजी घेतला आहे.

कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केलेल्या मालमत्तेबाबत (तारण मालमत्ता) कोणतेही व्यवहार करू नयेत. अशा मालमत्तेबाबत केलेले कोणतेही व्यवहार हे **महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या ३१,४८,६४५/- रुपये (अक्षरी रुपये एकतीस लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे पंचेचाळीस फक्त - ४ फेब्रुवारी २०२६ रोजीची रक्कम)** अधिक व्याजाच्या बोज्याखाली असतील.

तारण मालमत्ता सोडवून घेण्याबाबत उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात, कर्जदाराचे लक्ष उक्त कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) मधील तरतुदींकडे वेधले जात आहे.

जंगम मालमत्तेचे वर्णन:

बाब क्र. १ - लीलावती इंजिनिअरिंग, पत्ता: शॉप क्र. ४९, ब्लॉक-ए, मिनेवेरा इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट क्र. ५० ते ५५, मुलुंड पश्चिम, मुंबई - ४०००८० येथे स्थित प्लांट आणि यंत्रसामग्री (मशिनरी), यंत्रसामग्रीचे सुटे भाग (स्पेअर्स), अवजारे आणि उपसाधने (ॲक्सेसरीज) तसेच विद्युत यंत्रणा आणि फिक्स्चर्स यांच्यावर प्रथम आणि अनन्य अधिकार येथे स्थित.

अ.क्र.	मशीनचे मॉडेल आणि उत्पादक	संख्या	पुरवठादार
१.	एलएल२०टी एल५ सीएनसी लेथ - एफएएनयुसी अनुक्रमांक एल२-०२४५४	०१	लक्ष्मी मशीन वर्क्स लिमिटेड
	एकूण	०१	

बाब क्र. २ - लीलावती इंजिनिअरिंग, पत्ता: शॉप क्र. ४९, ब्लॉक-ए, मिनेवेरा इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट क्र. ५० ते ५५, मुलुंड पश्चिम, मुंबई - ४०००८० येथे स्थित प्लांट आणि यंत्रसामग्री (मशिनरी), यंत्रसामग्रीचे सुटे भाग (स्पेअर्स), अवजारे आणि ॲक्सेसरीज, तसेच इलेक्ट्रिकल इन्स्टॉलेशन्स आणि फिक्स्चर्स यांवर प्रथम आणि अनन्य अधिकार.

अ.क्र.	मशीनचे मॉडेल आणि उत्पादक	संख्या	पुरवठादार
१.	त्सुगामी बनावटीचे सीएनसी प्रिसिजन ऑटोमॅटिक लेथ (मॉडेल क्र. एमआय०८जे-II) - प्रमाणित आणि वैकल्पिक उपकरणांसह (सिरियल क्र. ३०४६६सी)	०१	त्सुगामी प्रिसिजन इंजिनिअरिंग इंडिया प्रा. लि.
	एकूण	०१	

दिनांक : १०.०७.२०२६ सही/- प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता
ठिकाण: मुलुंड, मुंबई महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

फॉर्म जी
दुसऱ्यांदा प्रसिद्धी
जेबीएफ इंडस्ट्रीज लिमिटेडसाठी
स्वारस्य अभिव्यक्तीकरिता आमंत्रण
येथे पॉलिस्टर चिप्स, पॉलिस्टर यार्न आणि प्रोसेस्ड यार्न क्षेत्रात कार्यरत (उत्पादन युनिट नाही)
(भारतीय दिवाळखोरी आणि नादारी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या नियम ३६अ च्या उप-नियम (१) अंतर्गत)

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव, तसेच पॅन आणि सीआयएन/एलएलपी क्रमांक	**जेबीएफ इंडस्ट्रीज लिमिटेड पॅन : AAACJ2575J सीआयएन :L99999DN1982PLC000128**
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	दुकान क्र. ४, तळमजला, इमारत क्र. ए, शुभ लक्ष्मी कॉम्प्लेक्स, प्रभात स्कूलजवळ, चाननदेवी, आमली, सिल्वासा, दादरा आणि नगर हवेली - ३९६२३०
३.	संकेतस्थळाचा पत्ता	www.jbfindustries.co.in
४.	बहुतांश स्थिर मालमत्ता असलेल्या ठिकाणाचा तपशील	कोणतीही स्थिर मालमत्ता नाही
५.	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता	कोणत्याही उत्पादन सुविधा नाहीत
६.	मागील आर्थिक वर्षात विकलेल्या मुख्य उत्पादने/सेवांची संख्या आणि मूल्य	काहीही नाही
७.	कर्मचारी/कामगारांची संख्या	सद्यस्थितीत काहीही नाही
८.	मागील दोन वर्षांची उपलब्ध आर्थिक विवरणपत्रे (अनुसूचींसह), धनकोंची यादी यासह अधिक तपशील या युआरएल वर उपलब्ध आहे	लेखापरीक्षित आर्थिक विवरणपत्रे www.jbfindustries.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
९.	संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत निराकरण अर्जदारांची पात्रता या युआरएल वर उपलब्ध आहे:	www.jbfindustries.co.in, तसेच, cirp.jbf@gmail.com या ईमेलद्वारेही ते मिळवता येईल.
१०.	इच्छुकता अभिव्यक्ती प्राप्त करण्याची अंतिम तारीख	२५-०७-२०२६
११.	संभाव्य निराकरण अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख	२७-०७-२०२६
१२.	तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याची अंतिम तारीख	०१-०८-२०२६
१३.	संभाव्य निराकरण अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख	०२-०८-२०२६
१४.	संभाव्य निराकरण अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि निराकरण योजनांसाठी विनंती जारी करण्याची तारीख	०३-०८-२०२६
१५.	निराकरण योजना सादर करण्याची अंतिम तारीख	०२-०९-२०२६
१६.	इच्छुकता अभिव्यक्ती सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी	cirp.jbf@gmail.com
१७.	एमएसएमई म्हणून कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणी स्थितीचा तपशील	लागू नाही

सही/-
मुकेश वर्मा
आयबीबीआय रजि. क्रमांक : आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१६६५/२०१९-२०२०/१२५२२
दिनांक: १०-०७-२०२६ बी १५०६, सनटेक सिटी अॅव्हेन्यू २, गोरेगाव पश्चिम, मुंबई ४००१०४
स्थळ: मुंबई **जेबीएफ इंडस्ट्रीज लिमिटेड साठी**

Kogta FINANCIAL

कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड

सीआयएन क्र. U67120RJ1996PLC011406, कॉर्पोरेट कार्यालय: एस-१, गोपालबारी, अजमेर पुलियाजवळ, मेट्रो पिलर क्र. १४३ च्या समोर, जयपूर ३०२००१, राजस्थान, भारत.
दूरध्वनी: +९१ १४१ ६७६७०६७, **नोंदणीकृत कार्यालय:** कोगटा हाऊस, आझाद मोहल्ला, बिजयनगर - ३०५६२४, राजस्थान, भारत
ईमेल: info@kogta.in | **www.kogta.in**

परिशिष्ट ४ [नियम ८(१) पहा] ताबा सूचना

ज्याअर्थी, खाली सही करणारे **'कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड'**चे प्राधिकृत अधिकारी यांनी, 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२' (सरफेसी कायदा) अन्वये आणि 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, **१९.०१.२०२६** रोजी एक मागणी नोटीस जारी केली होती. या नोटिशीद्वारे कर्जदार/हमीदार/तारणकर्ता **श्री. सोमनाथ आदिनाथ कदम, आदिनाथ रोहिदास कदम यांचा मुलगा (अर्जदार), गुरुकृपा @ गुरुकृपा मिल्क बिझनेस याचे मालक श्री. सोमनाथ आदिनाथ कदम, सौ. सविता आदिनाथ कदम, श्री.आदिनाथ रोहिदास कदम यांच्या पत्नी (सह-अर्जदार/तारणकर्ता) यांना सूचित करण्यात आले होते की, त्यांनी त्यांचे कर्ज खाते क्रमांक ०००० ३६७४३७ आणि ०००० ४८११०३** अंतर्गत अनुक्रमे **रु. १२,६७,३०६/- (अक्षरी रुपये बारा लाख सदुसष्ठ हजार तीनशे सहा फक्त) आणि रु. ७,५०,५३०/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार पाचशे तीस फक्त) - म्हणजेच एकत्रितपणे एकूण देय रक्कम रु. २०,१७,८३६/- (अक्षरी रुपये वीस लाख सतरा हजार आठशे छत्तीस फक्त) ही रक्कम दि.१५.०१.२०२६** रोजीच्या स्थितीनुसार, तसेच त्यावर पुढील व्याज आणि इतर कायदेशीर शुल्क, पूर्ण परतफेड होईपर्यंत, नोटीसच्या तारखेपासून किंवा सदर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावी. कर्जदार/तारणकर्ता यांनी रक्कम परत करण्यात कसूर केल्यामुळे, याद्वारे कर्जदार/तारणकर्ता आणि सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा, संबंधित कायद्याच्या कलम १३(४) अन्वये आणि संबंधित नियमांच्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, **९ जुलै २०२६** रोजी माझ्याद्वारे घेण्यात आला आहे. तारण ठेवलेली मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीबाबत, कायद्याच्या कलम १३ च्या पोट-कलम (८) मधील तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

कर्जदार/तारणकर्ता आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेबाबत कोणतेही व्यवहार करू नयेत; मालमत्तेबाबत केलेले कोणतेही व्यवहार हे 'कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड'च्या दाव्याच्या अधीन असतील. हा दावा **रु. १२,६७,३०६/- (अक्षरी रुपये बारा लाख सदुसष्ठ हजार तीनशे सहा फक्त) आणि रु. ७,५०,५३०/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार पाचशे तीस फक्त) इतक्या रकमेसाठी आहे; म्हणजेच १५.०१.२०२६ रोजीची एकूण देय रक्कम रु. २०,१७,८३६/- (अक्षरी रुपये वीस लाख सतरा हजार आठशे छत्तीस फक्त)** इतकी आहे. ही रक्कम **पुढील व्याज, कायदेशीर खर्च आणि पूर्ण परतफेडीपर्यंत** त्यावर होणारे व्याज व खर्च यांसह देय आहे.

अचल मालमत्तेचे वर्णन

महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील मौजे मोकल ओहाळ येथील गट क्र. ४६/१, एकूण क्षेत्र १ हेक्टर ६० आर मधील ४० आर क्षेत्रापैकी, पश्चिमेकडील बाजूचा २० आर क्षेत्रफळाचा भूखंड, ज्यावर बांधकाम केलेले आहे आणि ज्याची ग्रामपंचायत मिळकत क्र. २८४ आहे, ही मालमत्ता सौ. सविता आदिनाथ कदम यांच्या मालकीची असून तिचे क्षेत्रफळ १८०० चौरस फूट इतके आहे.

या मालमत्तेच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व : श्री. सोमनाथ आदिनाथ कदम यांचा गट क्र. ४६/१ मधील उर्वरित भाग, पश्चिम : गट क्र. ४६/१ मधील रस्ता, उत्तर : भानुदास रोहिदास कदम यांचा गट क्र. ४६/१, दक्षिण : आदिनाथ रोहिदास कदम यांचा गट क्र. ४६/२.

तारीख: ०९.०७.२०२६ **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण: मोकल ओहाळ. **कोगटा फायनान्शियल (इंडिया) लिमिटेड**

बँक ऑफ बडोदा / Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा
मुंबई मेट्रो पश्चिम रिजन : शारदा भवन, श्री वैकुंठलाल मेहता मार्ग, मिठीबाई कॉलेजसमोर., जुहू विलेपार्ले, मुंबई - ४००५६, भारत **दूरध्वनी:** ०२२-२०८६१८८६ **ई-मेल: recovery.mmwr@bankofbaroda.com**
वेबसाइट: www.bankofbaroda.com

अचल मालमत्तेच्या विक्रीबाबतची विक्री सूचना "परिशिष्ट- ४-ए [नियम ६ (२) आणि ८ (६) मधील परंतुक पहा]"

(baanknet.com वर आयोजित लिलावासाठी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धीकरिता संक्षिप्त विक्री सूचना)

'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२' आणि त्यासोबत 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' मधील नियम ६(२) व ८(६) च्या परंतुकाचा संदर्भ) अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसाधारण जनतेस आणि विशेषत: कर्जदार, तारण देणारे व हमीदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली आणि 'सुरक्षित धनको' यांच्याकडे तारण ठेवलेली/भारित केलेली स्थावर मालमत्ता - ज्याचा ताबा 'बँक ऑफ बडोदा'सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. ती खाली नमूद केलेल्या खात्यांमधील देणी वसूल करण्यासाठी **"जशी आहे तशी", "ज्या स्थितीत आहे तशी" आणि "जी काही आहे तशी"** या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/तारण देणारे/हमीदार/तारण मालमत्ता/देणी/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खाली नमूद केला आहे.

अ. क्र. / लॉट क्र.	कर्जदार / जामीनदार / तारणकर्ता यांचे नाव व पत्ता	स्थावर मालमत्तेचे वर्णन व त्यावर काही ज्ञात बोजा असल्यास त्याचा तपशील	एकूण देय रक्कम	ई-लिलावाची तारीख व वेळ	(१) राखीव किंमत व (२) मालमत्तेची ईएमडी रक्कम (३) बोली वाढीची रक्कम	ताबा स्थिती (सांकेतिक / प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ
१.	श्री. दत्तात्रय महादेव रोकडे आणि सौ. रोहिणी रोकडे	फ्लॅट क्र. सी-१०४, ॲडव्हेंट नील रेसिडेन्सी, पूर्ण प्रज्ञा हायस्कूलच्या मागे, बारूच रोड, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८.	रु. ३९,१६,५८४.८५/- + दिनांक ०१.०३.२०२५ पासून लागू होणारे व्याज + कायदेशीर व इतर खर्च.	१७.०८.२०२६ १४:०० ते १८:००	रु. ९७,९७,४००/- रु. ९,७९,७४०/- रु. २०,०००/-	सांकेतिक ताबा	१२.०८.२०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:०० श्री. सुंथवाल ललित कुमार **मोबाईल :** ८६५७७४४५३६ / ९८२०६४२४२६ **शाखा : चारकोप**

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.bank.in/e-auction या संकेतस्थळाला आणि Baanknet.com या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी **९८२०६४२४२६ या मोबाईल** क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

दिनांक: ०८.०७.२०२६ **सही/-**
स्थळ: मुंबई **प्राधिकृत अधिकारी,**
बँक ऑफ बडोदा

बँक ऑफ बडोदा / Bank of Baroda

बँक ऑफ बडोदा
मुंबई मेट्रो पश्चिम रिजन : शारदा भवन, श्री वैकुंठलाल मेहता मार्ग, मिठीबाई कॉलेजसमोर., जुहू विलेपार्ले, मुंबई - ४००५६, भारत **दूरध्वनी:** ०२२-२०८६१८८६ **ई-मेल: recovery.mmwr@bankofbaroda.com**
वेबसाइट: www.bankofbaroda.com

अचल मालमत्तेच्या विक्रीबाबतची विक्री सूचना "परिशिष्ट- ४-ए [नियम ६ (२) आणि ८ (६) मधील परंतुक पहा]"

(baanknet.com वर आयोजित लिलावासाठी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धीकरिता संक्षिप्त विक्री सूचना)

'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२' आणि त्यासोबत 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' मधील नियम ६(२) व ८(६) च्या परंतुकाचा संदर्भ) अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसाधारण जनतेस आणि विशेषत: कर्जदार, तारण देणारे व हमीदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली आणि 'सुरक्षित धनको' यांच्याकडे तारण ठेवलेली/भारित केलेली स्थावर मालमत्ता - ज्याचा ताबा 'बँक ऑफ बडोदा'सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. ती खाली नमूद केलेल्या खात्यांमधील देणी वसूल करण्यासाठी **"जशी आहे तशी", "ज्या स्थितीत आहे तशी" आणि "जी काही आहे तशी"** या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/तारण देणारे/हमीदार/तारण मालमत्ता/देणी/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खाली नमूद केला आहे.

अ. क्र. / लॉट क्र.	कर्जदार / जामीनदार / तारणकर्ता यांचे नाव व पत्ता	स्थावर मालमत्तेचे वर्णन व त्यावर काही ज्ञात बोजा असल्यास त्याचा तपशील	एकूण देय रक्कम	ई-लिलावाची तारीख व वेळ	(१) राखीव किंमत व (२) मालमत्तेची ईएमडी रक्कम (३) बोली वाढीची रक्कम	ताबा स्थिती (सांकेतिक / प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ
१.	श्री. राकेश मनुकुमार शहा आणि श्री. कुंजल राकेश शहा आणि श्री. मनुकुमार हिमतलाल शाह	फ्लॅट क्रमांक १९०३ आणि १९०४, १९ वा मजला, हीना एलिगन्स को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि., भाटिया शाळा समोर., न्यू साईबाबा नगर, सीटीएस क्रमांक १५/ई, कांदिवली गाव, बोरिवली पश्चिम, मुंबई ४०००९२.	रु. ३,१५,६४,३४३/- + १०.०७.२०२५ पासून मासिक चक्रवाढ व्याजासह जमा झालेले व्याज + कायदेशीर व इतर खर्च.	१७.०८.२०२६ १४:०० ते १८:००	**रु. ४,७६,००,०००/- रु. ४७,६०,०००/- रु. २५,०००/-**	सांकेतिक ताबा	१२.०८.२०२६ **आणि** सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० वाजेपर्यंत श्री. सचिन - मोबाईल : ८६५७७४४५७१ / ९८२०६४२४२६ शाखा : महावीर नगर

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.bank.in/e-auction या संकेतस्थळाला आणि **Baanknet.com** या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी **९८२०६४२४२६** या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

दिनांक: ०८.०७.२०२६ **सही/-**
स्थळ: मुंबई **प